दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

नाशिकमध्ये 57 हजार कोटींची गुंतवणूक ! 24 हजार रोजगारनिर्मिती

नाशिक : महाराष्ट्र शासनाच्या 'इन्व्हेस्ट महाराष्ट्र' उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या सामंजस्य करारांमधून नाशिक जिल्ह्यासाठी तब्बल ५७ हजार १२० कोटी रुपयांच्या प्रस्तावित गुंतवणुकीचे आठ प्रकल्प समोर आले आहेत. या प्रकल्पांच्या माध्यमातून सुमारे २४ हजार १२५ रोजगारनिर्मितीची क्षमता निर्माण होण्याची शक्यता आहे. नाशिकसाठी यापूर्वी प्रस्तावित असलेल्या सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीव्यतिरिक्त ही नवी गुंतवणूक असल्याने जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मराठीला स्वाभिमान आणि भावनेपुरते मर्यादीत न ठेवता ज्ञान भाषा बनविणे आवश्यक - मुख्यमंत्री

मुंबई : मराठी भाषा फक्त स्वाभिमान आणि भावनेचा विषय न राहता ज्ञानाची भाषा बनवायची असेल, तर आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तिचा वापर वाढविणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), क्वांटम कॉम्प्युटिंग, अवकाश तंत्रज्ञान आणि जैवतंत्रज्ञानासारख्या क्षेत्रांमध्ये मराठीसाठी व्यवस्था विकसित करण्याबरोबरच डिजिटल माध्यमांवर मोठ्या प्रमाणात मराठी आशय निर्माण करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी केले.

छत्रपती संभाजीनगर ❀ रविवार, दि. ०४ ऑक्टोंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १६३ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

आळंदजवळ अपघातात दोघांचा मृत्यू

सिल्लोड : आळंद गावाजवळ शुक्रवारी रात्री भीषण अपघात होऊन छत्रपती संभाजीनगर कडून सिल्लोडकडे येणाऱ्या दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला आहे. हा अपघात शुक्रवार २ ऑक्टोबर रोजी रात्री १० ते ११ च्या दरम्यान आळंद गावाजवळ (ता. फुलंब्री) घडला. मृतांची ओळख पटली असून चांद नबी पटेल रा. आव्हाना रोड सिल्लोड शहर आणि शेख समद अहमद शेख मूळ रा.दौलताबाद ह.मु. गुलशन नगर सिल्लोड अशी मृतांची नावे आहेत. अपघातानंतर नागरिकांनी दोन्ही जखमींना तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात दाखल केले तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. समद अहमद शेख यांच्यावर शनिवारी, ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता दौलताबाद येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. चांद पटेल यांचा दफनविधी शनिवारी दुपारी सिल्लोड येथे झाला.या अपघात प्रकरणी वडोद बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

अज्ञात वाहनाला बुलेटची धडक; माळीचिंचोराचे तिघे जागीच ठार

टाकळीभान : बुलेटने अज्ञात वाहनास पाठीमागून धडक दिल्याने तीन सख्ख्या भावांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास नेवासा -श्रीरामपूर रस्त्यावरील पुनतगाव फाटा येथे घडली. या अपघातात आदित्य अंबादास अहिरे (वय १६), दीपक अंबादास अहिरे (वय १४) व चैतन्य अंबादास अहिरे (वय १२) अशी या अपघातात ठार झालेल्यांची नावे आहेत. नेवासा तालुक्यातील माळीचिंचोरा येथील अंबादास अहिरे यांची तीन मुले बुलेट मोटारसायकलवरुन नेवासा कडून श्रीरामपूरकडे येत होते. रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास पुणतगाव फाट्याजवळ त्यांचा मोटारसायकलवरील ताबा सुटला. ही बुलेट अज्ञात वाहनावर पाठीमागे जावून धडकली. अपघात एवढा भीषण होता की तिघांचाही जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच नेवासा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. सदर मृतदेह शवविच्छेदनासाठी नेवासा फाटा येथील ग्रामीण रुग्णालय येथे नेण्यात आले, पुढील तपास पोलीस करत आहे.

बॉलिवूडची लोकप्रिय अभिनेत्री माधुरी दीक्षित ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून सहभागी

नांदेड : आरएसपीएल ग्रुपने आज घडी डिटर्जंटची नवी मोहीम "विश्वास की परीक्षा" लाँच केल्याची घोषणा केली. या मोहिमेत बॉलिवूड सुपरस्टार माधुरी दीक्षित ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून सहभागी झाल्या आहेत. "विश्वास की खास बात ये है कि, उसपर हमेशा खरा उतरना पड़ता है" - या विश्वासावर आधारित ही मोहीम तयार करण्यात आली आहे. विश्वासाविषयीची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यावर नेहमी खरे उतरावे लागते. हाच संदेश देत ही मोहीम, ब्रँडवर विश्वास ठेवणाऱ्या भारतातील लाखो कुटुंबांसाठी उत्पादनाचा अनुभव सातत्याने अधिक चांगला करण्याच्या घडीच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते. ही मोहीम नव्याने विकसित करण्यात आलेल्या फॉर्म्युलेशनवर केंद्रित आहे, जे भारतातील शहरी आणि निमशहरी भागांमधील ग्राहकांच्या बदलत्या कपडे धुण्याच्या सवयी लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहे.

प्राँटोकडून 150 व्यावसायिकांसाठी आरोग्य शिबिर

पुणे : जागतिक हृदय दिनानिमित्त झटपट घरपोच सेवा देणाऱ्या प्राँटोने पुण्यात आपल्या व्यावसायिकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले. या शिबिरात १५० व्यावसायिकांची मोफत प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी करण्यात आली. हा उपक्रम प्राँटोच्या 'पॉवर-अप, पार्टनर बेनिफिट्स' कार्यक्रमाचा भाग आहे. व्यावसायिकांच्या आरोग्य, सुरक्षा, आर्थिक सुस्थिती आणि वैयक्तिक कल्याणाला पाठबळ देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

बाष्पीभवनाने नाथसागराच्या पाणीसाठ्यात मोठी घट; दोन्ही कालवे बंद



पैठण.: मराठवाड्याची जीवनवाहिनी असलेल्या नाथसागर जलाशयाच्या पाणीपातळीत ऑक्टोंबर हिट मुळे झापाट्याने घट होत आहे.उन्हाची तीव्रता कायम असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात पाण्याचे बाष्पीभवन होत आहे. त्यामुळे आगामी काळातील पाणी नियोजनाची चिंता वाढली आहे. जलाशयाच्या नोंदीनुसार, धरणाची पाणीपातळी १,५१८.०२ फूट, एकूण पाणीसाठा २,४६४.९ दलघमी, तर जिवंत पाणीसाठा १,७२६.७९४ दलघमी आहे. विशेष म्हणजे गतवर्षी याच दिवशी उपयुक्त पाणीसाठ्याची टक्केवारी ९९.१७ टक्के होती. यंदा ती ७९.५४ टक्क्यांवर आल्याने गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी पाण्याची मोठी घट झाली आहे. जायकवाडी धरणाचे अभियंता मंगेश शेलार यांनी दिलेल्या माहिती नुसार महिनाभर पुरेल एवढ्या पाण्याचे दररोज बाष्पीभवन होत आहे.

धरणात सध्या पाण्याची आवक शून्य क्युसेक आहे. त्यातच दररोज १.५६२ दलघमी पाण्याचे बाष्पीभवन होत आहे. म्हणजेच सुमारे १५६.२ कोटी लिटर पाणी दररोज बाष्पीभवनामुळे कमी होत आहे. पावसाळा संपण्याच्या टप्प्यावरही पावसाची प्रतीक्षा कायम असून, जलाशयात नव्याने पाण्याची आवक न झाल्यास उपलब्ध साठ्यावरच पुढील काळाचे नियोजन करावे लागणार आहे. पैठण तालुक्यासह मराठवाड्यात गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने मोठी दडी मारली आहे. त्यामुळे खरीप हंगामातील कापूस, ज्वारी, बाजरी, मका आणि सोयाबीन या पिकांना पावसाच्या खंडाचा मोठा फटका बसला आहे. पिकांच्या वाढीच्या निर्णायक टप्प्यात पाऊस न झाल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.खरीप पिकांचे नुकसान झाल्यानंतर आता शेतकऱ्यांच्या नजरा रब्बी हंगामाकडे लागल्या आहेत. मात्र नाथसागरमध्ये पाण्याची आवक शून्य असल्याने रब्बीच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार का? हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. आगामी काळात पाऊस न झाल्यास पिण्याचे पाणी, शेती आणि औद्योगिक वापरासाठी उपलब्ध साठ्याचे काटेकोरपणे नियोजन करण्याची वेळ येण्याची शक्यता आहे.

जलाशयाच्या नोंदीनुसार, ३ ऑक्टोबरपर्यंत एकूण पर्जन्यमान २२० मिमी नोंदले गेले आहे. १ जूनपासून नाथसागरमध्ये एकूण १,८८६.८१९ दलघमी पाण्याची आवक झाली असून, आतापर्यंत १६३.९२२८ दलघमी पाण्याचा विसर्ग झाल्याची नोंद आहे.

पाणी काटकसरीने वापरण्याची गरज....

सध्या नाथसागरमध्ये जवळपास ८० टक्के पाणीसाठा असल्याने तातडीची पाणीटंचाई निर्माण झालेली नसली, तरी आवक पूर्णपणे बंद असणे, पावसाचा दीर्घ खंड आणि दररोज होणारे मोठ्या प्रमाणातील बाष्पीभवन ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबरोबरच आगामी पावसाचा अंदाज घेऊन शेती, पिण्याचे पाणी आणि उद्योगांसाठीचे नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

नाथसागरची स्थिती....

पाणीपातळी : १,५१८.०२ फूट

उपयुक्त पाणीसाठा : १,७२६.७९४ दलघमी

पाणीसाठा : ७९.५४ टक्के

गतवर्षी : ९९.१७ टक्के

आजची पाण्याची आवक : शून्य क्युसेक

दररोजचे बाष्पीभवन : १.६१७ दलघमी

दररोज बाष्पीभवनातून घटणारे पाणी : सुमारे १५६.२ कोटी लिटर

एकूण पर्जन्यमान : २२० मिमी

१ जूनपासून पाण्याची आवक : १,८८६.८१९ दलघमी.

दोन्ही कालवे बंद.

नाथासागर जलाशयाच्या पाणीसाठ्याची परिस्थिती पाहता धरनाचा उजवा कालव्याचा विसर्ग दिनांक २९ सप्टेंबर रोजी बंद करून डाव्या कालव्यातुन होणारा विसर्ग हळू हळू कमी करून तो १ ऑक्टोंबर रोजी पूर्ण पणे बंद करण्यात आला आहे . आता पुढील रब्बी आवर्तनासाठी आणि पाणीसाठा उपलब्धतेनुसार १५ ऑक्टोबर पर्यंत होणाऱ्या निर्णयानुसार विसर्गाची दिशा ठरणार आहे.

जलसेवा संकल्प अभियान पंधरवाड्याला सुरुवात.

२ ऑक्टोबर पासून मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक श्रीमती सुनंदा जगताप यांच्या शुभहस्ते जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता गणेश हासे यांच्या प्रमुख उपस्थित नाथसागर जलाशयावर जलसेवा संकल्प अभियानातर्गत जलपूजन व जलजागृती शपथविधी घेऊन पंधरवाड्याला सुरुवात करण्यात आली. यात २ ते १७ ऑक्टोंबर प्रत्येक दिवशी वेगवेगळी कामे कारण्यात येणार आहे. यात पाणी पट्टी तक्रार निवारण,लाभक्षेत्रात पाणी वापर संस्था स्थापन,कालवे संवर्धन,धरण परिसरातील वृक्षाचे संवर्धन, संगोपन, रोपण श्रमदन,जनजागरण, शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी मार्गदर्शन, आणि शेवटच्या दिवशी पालकमंत्री यांच्या उपस्थितीत कार्यशाळा,महिला मेळावा तसेच सत्कार समारोह पार पडणार आहे.

जायकवाडी धरणातील पाणीसाठाही झपाट्याने घटतोय

पैठणच्या नाथसागर जलाशयाच्या पाणीसाठ्यावरही वाढत्या तापमानाचा परिणाम होत आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला जायकवाडीच्या वरच्या भागात चांगला पाऊस झाल्यामुळे धरण जवळपास ९५ टक्क्यांपर्यंत भरले होते. मात्र त्यानंतर पावसाने उघडीप दिली आणि त्यातच सप्टेंबर महिन्यापासून वाढलेल्या तापमानामुळे ऑक्टोंबरच्या पहिल्या आठवड्यात बाष्पीभवनाचा वेग वाढला.

सप्टेंबर आणि ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात वाढत्या तापमानामुळे जायकवाडीच्या जलसाठ्यातून झपाट्याने पाणी कमी होत असल्याचे चित्र आहे. उपलब्ध माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर आणि जालना या दोन्ही जिल्ह्यांच्या पिण्याच्या आणि औद्योगिक वापरासाठी सुमारे १२० दिवस पुरेल एवढ्या पाण्याचे बाष्पीभवन झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे जायकवाडीच्या पाणीसाठ्याबाबत चिंता वाढली आहे.

हिंगोलीत सकाळी दोनवेळा भूकंपाचे धक्के; 4.5 रिश्टर स्केल तीव्रतेची नोंद

हिंगोली, ३ ऑक्टोबर : हिंगोली जिल्ह्यात शनिवारी सकाळी भूकंपाचे दोन धक्के जाणवले. वसमत तालुयातील पांगरा शिंदे परिसरात सकाळी ९.४३ वाजता ४.५ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली. यापूर्वी सकाळी ७.४६ वाजता ३.३ रिश्टर स्केल तीव्रतेचा सौम्य धक्का जाणवला. वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे हे भूकंपाचे केंद्रबिंदू असल्याचे स्पष्ट झाले आहे. या दोन्ही घटनांमध्ये प्राथमिक माहितीनुसार जिल्ह्यात कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झालेली नाही. नागरिकांनी घाबरून जाऊ नये किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुयातील पांगरा शिंदे परिसरात शनिवारी सकाळी ९.४३ वाजता ४.५ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली. या भूकंपाचे धक्के हिंगोली शहरासह जिल्ह्यातील विविध भागांत जाणवले. सकाळी शहरातील शाळा, महाविद्यालयातील इमारतींमध्ये वर्ग सुरू असतांना अचानक जमिनीतून आवाज आल्यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांनी वर्गाबाहेर सुरक्षित स्थळी धाव घेतली तर नागरिकांनीही तत्काळ घराबाहेर पडत सुरक्षित ठिकाणी जाणे पसंद केले. वारंवार जिल्ह्यात होणाऱ्या भूकंपामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील वसमत, पांगरा शिंदे, शिरळी, कळमनुरी तालुक्यातील गावे, हिंगोली शहरासह परिसरात तसेच औंढा नागनाथ तालुक्यातही भूकंपाचे धक्के जाणवले आहे. या भूकंपाचे केंद्र वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे हे असून नांदेड शहरासह परिसरात आणि यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड शहरासह काही गावांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले आहेत.

हिंगोली जिल्ह्यात प्राथमिक माहितीनुसार, भूकंपाच्या धक्क्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही. जिल्हा प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे. ही माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून देण्यात आली आहे. हिंगोली जिल्ह्यात शनिवारी सकाळी भूकंपाचे दोन धक्के जाणवले. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी जिल्ह्यातील परिस्थितीची सविस्तर माहिती घेतली असून, जिल्हा प्रशासनाने सतर्क राहून आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. औंढा नागनाथ तालुयातील गढाळा परिसरात सकाळी ७.४६ वाजता भूगर्भातून आवाजासह सौम्य धक्का जाणवला. या धक्क्याची नोंद ३.३ रिश्टर स्केल इतकी झाली.

प्रशासनाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून, आवश्यक त्या ठिकाणी पाहणी व पंचनाम्याची कार्यवाही करण्यात येत आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये. जिल्हा प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अधिकृत माहितीसाठी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

त्र्यंबकेश्वर मंदिरात '३ते१२' तारखेपर्यंत VIP दर्शन बंद

नाशिक : पितृपक्षाच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वरमध्ये भाविकांची मोठी गर्दी होत आहे. शनिवार-रविवारच्या सलग सुट्ट्यांमुळे गेल्या दोन दिवसांपासून त्र्यंबकेश्वरमध्ये भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पितृकर्म आणि धार्मिक विधींसाठी राज्यासह देशभरातून भाविक त्र्यंबकेश्वरमध्ये दाखल होत आहेत. वाढत्या गर्दीमुळे मंदिर परिसरातील दर्शन व्यवस्था सुरळीत ठेवण्याचे आव्हान प्रशासनासमोर निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी आणि सामान्य भाविकांना सुलभ दर्शन मिळावे, यासाठी त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टने ३ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सर्व प्रकारचे VIP दर्शन बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत देवस्थान ट्रस्टकडून पत्रक जारी करण्यात आले आहे. मात्र, केंद्र किंवा राज्य शासन तसेच जिल्हाधिकारी यांच्यामार्फत प्राप्त होणाऱ्या राज्य शिष्टाचारासंबंधीच्या लेखी पत्रव्यवहारानुसार असलेल्या अपवादांना हा निर्णय लागू राहणार नाही, असे ट्रस्टने स्पष्ट केले आहे. वाढत्या गर्दीचे योग्य नियोजन करणे, सामान्य भाविकांना सुलभतेने दर्शन घेता यावे आणि मंदिरातील दर्शन व्यवस्था सुरळीत ठेवणे हा या निर्णयामागील मुख्य उद्देश असल्याचे देवस्थान ट्रस्टने सांगितले आहे. भाविकांनी या निर्णयाची नोंद घेऊन मंदिर प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान, गेल्या दोन दिवसांपासून त्र्यंबकेश्वर शहरात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. भाविकांसह वाहनांची संख्या वाढल्याने पादचारी आणि दुचाकीस्वारांनाही मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्र्यंबकेश्वर बस स्थानक ते गजानन महाराज संस्थान या मार्गावर सकाळी आणि संध्याकाळच्या वेळेत मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याचे चित्र आहे. या वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी पोलिसांकडून पुरेसे सहकार्य मिळत नसल्याचा आरोप काही नागरिकांकडून करण्यात येत आहे. पितृपक्षामुळे पुढील काही दिवसही त्र्यंबकेश्वरमध्ये भाविकांची गर्दी कायम राहण्याची शक्यता असल्याने दर्शन व्यवस्था आणि वाहतूक नियोजनाकडे प्रशासनाचे लक्ष लागले आहे.

पुणे शिक्षक मतदारसंघ अखेर भाजपकडे

मुंबई : विधान परिषदेच्या पाच जागांच्या निवडणुकीसाठी महायुतीतील जागावाटपाचा तिढा अखेर सुटला आहे. पुणे शिक्षक मतदारसंघावर भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून दावा केला जात असताना ही जागा भाजपला देण्यावर महायुतीत एकमत झाल्याची माहिती आहे. त्यामुळे भाजप तीन, शिवसेना एक आणि राष्ट्रवादी काँग्रेस एक अशा जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित झाल्याचे सांगितले जात आहे. मात्र, इच्छुकांची संख्या आणि स्थानिक पातळीवरील दावे लक्षात घेता उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच महायुतीसमोर बंडखोरीचे आव्हान उभे राहिले आहे. महायुतीच्या संभाव्य जागावाटपानुसार पुणे शिक्षक, पुणे पदवीधर आणि नागपूर पदवीधर या तीन जागा भाजप लढविणार

मिठी नदी गाळ उपसा घोटाळ्यात आदित्य ठाकरेंची चौकशी करा, शिवसेनेची मागणी

मुंबई: मिठी नदी गाळ उपशात झालेल्या ६५ कोटींच्या घोटाळ्यात अभिनेता डिनो मोरिया याला आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली असून, या प्रकरणी उबाठा आमदार आदित्य ठाकरे यांची चौकशी व्हावी, अशी मागणी शिवसेना प्रवक्त्या शीतल म्हात्रे यांनी शनिवारी केली. आदित्य ठाकरे आणि डिनो मोरिया यांचे व्यावसायिक संबंध असल्याने, कोविड काळात मुंबई महापालिकेतून दिलेल्या कंत्राटांची श्वेत पत्रिका काढावी अशी मागणी त्यांनी केली.

बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत म्हात्रे म्हणाल्या, की डिनो मोरियाची अटक हे मिठी नदी गाळ उपसा घोटाळ्यातील हिमनगाचे टोक आहे. या घोटाळ्यात डिनोचा खास मित्र आदित्य ठाकरे याचा थेट संबंध आहे. उबाठाची सत्ता असताना डिनो मोरिया पालिकेत वारंवार यायचा. मोरिया आणि कंत्राटदार केतन कदम पार्टनर असल्याचे संभाषणातून सिद्ध झाले आहे. डिनो आणि आदित्य ठाकरे यांची प्रत्येक कॉन्ट्रॅक्टमध्ये कमिशन घेणारी वसुली गँग आहे, असा खळबळजनक आरोप म्हात्रे यांनी केला. कोविडकाळातील खिचडी घोटाळा, बॉडी बॅग घोटाळा, कोविड सेंटर घोटाळा, ऑक्सिजन प्लॅन्ट अशा कॉन्ट्रॅक्टची सखोल चौकशी होऊन श्वेत पत्रिका काढावी, अशी मागणी म्हात्रे यांनी मुंबई महापालिका आयुक्तांकडे केली.

अजिंठा घाटात तब्बल 14 तास ट्रॅफिक जाम; शालेय विद्यार्थी अन् परदेशी पर्यटकांचे हाल

छत्रपती संभाजीनगर-जळगाव महामार्गावर वाहने बंद पडल्याने हाहाकार पर्यटकांची विमाने आणि ट्रेन चुकल्यास जबाबदार कोण

फर्दापूर प्रतिनिधी : फर्दापूर छत्रपती संभाजीनगर-जळगाव महामार्गावरील अजिंठा घाटात शुक्रवारी रात्री ११ वाजेपासून ते शनिवारी दुपारी १ वाजेपर्यंत तब्बल १४ तास भीषण वाहतूक कोंडी ट्रॅफिक जाम झाल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल झाले घाटात एकामागोमाग एक अवजड वाहने बंद पडल्याने हा प्रसंग उद्भवला ऐन उन्हाच्या तडाख्यात लहान मुले शालेय विद्यार्थी आणि परदेशी पर्यटक पाण्यासाठी व्याकूळ झाल्याचे विदारक चित्र पाहायला मिळाले

नेमके काय घडले आणि कोंडी कशी फुटली

एकापाठोपाठ वाहने बंद इंदूरहून बंगळुरूला जाणारा ट्रक RJ 09 GE 8914 इंजिन खराब झाल्याने घाटात बंद पडला त्यापाठोपाठ MP 12 6794 आणि MH 19 Z 5437 हे दोन ट्रकही घाटात नादुरुस्त झाले भर म्हणून जळगावहून पुण्याला जाणारी एक खाजगी ट्रॅव्हल्स बस डिझेल संपल्याने घाटातच उभी राहिली

पोलिसांची तत्परता ट्रॅव्हल्समध्ये डिझेल टाकून ती मार्गस्थ करण्यात आली पोलीस मदतनीस फारुख पठाण यांनी एका ट्रकला अत्यंत कमी गतीने घाटाखाली सुखरूप उतरवले शनिवारी दुपारी एका ट्रकला क्रेनच्या साहाय्याने घाटाच्या माथ्यावर नेण्यात आले तर दुसऱ्याला मेकॅनिक बोलावून दुरुस्त



करण्यात आले त्यानंतर दुपारी १ वाजता वाहतूक सुरळीत झाली

पर्यायी मार्गांचा वापर कोंडीत अडकलेल्या काही छोट्या वाहनांनी तोंडापूर मार्ग तर काहींनी सोयगाव-हळदा मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे वाट धरली

यांनी घेतली मेहनत ही वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी फर्दापूर पोलीस स्टेशनचे कर्मचारी फिरोज तडवी स्वप्नील चव्हाण तसेच अजिंठा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन इंगळे बाबासाहेब भवर आणि महिला कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले

शासनाला सवाल दिवाळीच्या सुट्टीत पर्यटकांची सुरक्षा आणि वेळ वाऱ्यावर सोडणार का

विमाने आणि ट्रेन चुकल्यास नुकसान कोण देणार अजिंठा लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या अनेक देशी विदेशी पर्यटकांचे पुढील प्रवासाचे काटेकोर नियोजन असते अनेकांची ट्रेन किंवा विमानाचे Flight तिकीट बुक केलेले असते घाटातील अशा १४-१४ तास चालणाऱ्या ट्रॅफिक जॅममुळे जर पर्यटकांची विमाने किंवा ट्रेन चुकली तर त्यांच्या पैशांचे आणि वेळेचे होणारे भयंकर नुकसान कोण भरून देणार अशा कटू अनुभवामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या पर्यटन व्यवस्थेची पुरती अब्रू वेशीवर टांगली जात आहे

आपत्कालीन यंत्रणेचा पूर्ण अभाव आता काही दिवसांवर दिवाळीची सुट्टी येऊन ठेपली आहे या सुट्टीत जगभरातून लाखो पर्यटक येथे येतात घाटात एखादे वाहन बंद पडल्यास ते तत्काळ बाजूला करण्यासाठी महामार्ग प्राधिकरणाकडे NHAI कोणतीही कायमस्वरूपी क्रेन किंवा आपत्कालीन यंत्रणा उपलब्ध नाही

जर दिवाळीच्या गर्दीत असाच प्रकार घडला तर पर्यटकांचा हिरमोड होईल आणि अजिंठ्याकडे पर्यटकांची पाठ फिरेल त्यामुळे शासनाने आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने आतातरी झोपेतून जागे होऊन अजिंठा घाटातील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात अशी संतप्त मागणी प्रवाशांमधून होत आहे

"शाल जोडे"



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

दुष्काळाचे वास्तव, बांधावरील पाहणी आणि मदतीची आस

महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील अनेक जिल्हे आज पुन्हा एकदा भीषण दुष्काळाच्या सावटाखाली सापडले आहेत. पावसाची ओढ आणि उन्हाच्या तीव्र झळांमुळे शेतातील पिके कोमेजून गेली असून शेतकरी संकटाच्या दुष्टचक्रात अडकला आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह संपूर्ण मंत्रिमंडळ थेट शेतकऱ्यांच्या बांधावर उतरून पाहणी करत आहे. अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील मानकी देगाव येथे पाहणीदरम्यान महसूल मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या सोबतीने झाडाच्या सावलीत बसून पिठलं-भाकरीचा आस्वाद घेतला. लोकप्रतिनिधी आणि बळीराजा यांच्यातील हा भावनिक संवाद निश्चितच दिलासादायक असला, तरी या केवळ औपचारिकता न राहता दुष्काळग्रस्तांना वेळेत आणि ठोस मदत मिळणे ही काळाची मुख्य गरज आहे. शासनाने राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये अधिकृतपणे दुष्काळ जाहीर करून शैक्षणिक फी माफी आणि कर्जाबाबत दिलासा देण्याचे पाऊल उचलले आहे, ही एक समाधानाची बाब आहे. शासकीय विश्रामगृहात शेतकऱ्यांनी मांडलेले सावकारी, शेतीचे प्रश्न आणि कर्जबाजारीपणाचे पाढे हे महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचे भीषण वास्तव दाखवून देतात. तिथेच काही प्रश्नांची जागेवरच उकल करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच दुष्काळी सवलतींची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. सरकारी कागदपत्रांतील अटी व शर्तींच्या जाळ्यात शेतकरी भरडला न जाता, मदतीचा प्रत्येक रुपया थेट बळीराजाच्या खात्यापर्यंत आणि शेतापर्यंत पोहोचायला हवा. "सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे," हे मंत्र्यांचे आश्वासन कागदावर न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरायला हवे. बांधावर बसून खाल्लेल्या पिठलं-भाकरीचे ऋण मानून सरकारने वीज बिल माफी, पिण्याच्या पाण्याची सोय, जनावरांसाठी छावण्या आणि पीक विम्याची भरपाई तातडीने मंजूर केली पाहिजे. तरच निसर्गाच्या अवकृपेमुळे पोळलेल्या शेतकऱ्याच्या डोळ्यांतील आशेचा किरण टिकून राहील आणि त्याला या भीषण संकटातून बाहेर पडण्यासाठी खरी ताकद मिळेल.

लाकडांना 'जिवंत' करणारे गुरुजी! टाकाऊ लाकडांमध्ये शोधतात दडलेल्या कलाकृती

नैसर्गिक आकाराला देतात नवा अर्थ निसर्गाशी अनोखे नाते जपणाऱ्या राजेंद्र गुरुजींच्या कलेचे परिसरातून कौतुक

हिंदु प्रकाशवार्ता | अंधारी



डोंगरमाथ्यावरची शांतता... आजूबाजूला हिरवाई... पायवाटेवर पडलेल्या वाळलेल्या फांद्या... कुठे मुळांचे तुकडे, तर कुठे वाऱ्याने खाली पडलेले लाकूड! सामान्य माणसाच्या नजरेत हे केवळ टाकाऊ साहित्य असते. मात्र, अंधारी प्रशालेतील राजेंद्र गुरुजींच्या कलात्मक नजरेला त्याच लाकडामध्ये एखादा पक्षी, प्राणी, मानवी चेहरा किंवा एखादी आकर्षक आकृती दिसते.

गेल्या अनेक वर्षांपासून निसर्गभ्रमंती आणि कलात्मक निर्मितीचा अनोखा छंद जोपासत राजेंद्र गुरुजी नैसर्गिकरीत्या पडलेल्या लाकडांना वेगळे आणि आकर्षक रूप देत आहेत. लाकडाचा मूळ आकार, पोत, वळण आणि नैसर्गिक रचना यांचा बारकाईने अभ्यास करून त्यातील दडलेली कलाकृती ते आपल्या कल्पकतेने साकारतात.

साध्या लाकडात दिसते कलाकृती!

डोंगर-दऱ्यांत भटकंती करताना एखाद्या लाकडाचा आकार त्यांचे लक्ष वेधून घेतो. ते लाकूड हातात घेतल्यानंतर त्यातील नैसर्गिक रेषा, वळणे आणि आकारांचा बारकाईने विचार केला जातो. "या लाकडामध्ये नेमके काय दडले आहे?" याचा विचार करत त्यावर कलात्मक काम सुरू होते.

कधी एखाद्या वाकड्या फांदीमध्ये पक्ष्याची चोच दिसते, तर कधी मुळांच्या गुंतागुंतीत एखाद्या प्राण्याची आकृती जाणवते. काही लाकडांमध्ये मानवी चेहऱ्याचे रूप दिसते, तर काही तुकड्यांमध्ये निसर्गानेच एखादी सुंदर कलाकृती घडविल्यासारखी भासते.

राजेंद्र गुरुजी त्या नैसर्गिक आकाराला जास्त बदल न करता त्याचे सौंदर्य अधिक उठावदार करण्याचा प्रयत्न करतात.

निसर्गाने दिलेला आकार, कलाकाराने दिलेले रूप!

या कलेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लाकडाचा नैसर्गिक पोत आणि त्याची मूळ ओळख कायम ठेवणे. कृत्रिम आकार देण्याऐवजी लाकडामध्ये आधीपासून असलेला आकार ओळखून त्याला योग्य स्वरूप देण्यावर त्यांचा भर असतो. त्यामुळे प्रत्येक कलाकृती वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरते. त्यांच्या कलाकृतींकडे पाहताना असे वाटते की, लाकूड टाकाऊ नव्हतेच; फक्त त्यातील कला ओळखणारी नजर आवश्यक होती.

झाड तोडून नव्हे... पडलेल्या लाकडातून सर्जनशीलता!

राजेंद्र गुरुजी यांच्या उपक्रमाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पर्यावरणपूरक दृष्टिकोन. जिवंत झाडांना कोणतीही हानी न पोहोचवता जंगलात किंवा डोंगर परिसरात नैसर्गिकरीत्या पडलेल्या फांद्या, मुळे आणि लाकडाचा उपयोग करण्यावर त्यांचा भर असतो. "निसर्ग आपल्याला खूप काही देतो; फक्त ते पाहण्याची आणि जपण्याची दृष्टी हवी," या भावनेतून त्यांचा हा कलाप्रवास सुरू आहे. त्यांच्या कलाकृती केवळ सजावटीच्या वस्तू नसून निसर्ग संवर्धनाचा संदेश देणाऱ्या कलाकृती ठरत आहेत.



प्रत्येक लाकडात दडलेली असते एक कथा!

राजेंद्र गुरुजींच्या मते, निसर्गात आढळणारा प्रत्येक लाकडाचा तुकडा आपली एक वेगळी कथा सांगत असतो. एखादे झाड वादळामुळे पडलेले असते, एखादी फांदी नैसर्गिकरीत्या तुटलेली असते, तर एखादे मूळ मातीबाहेर आलेले असते. हीच नैसर्गिक रचना त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देते. "प्रत्येक लाकडाच्या तुकड्यात एक वेगळी आकृती दडलेली असते. ती शोधून बाहेर काढणे हेच माझे काम आहे."

राजेंद्र गुरुजी पक्षी, प्राणी, मानवी आकृती अन् बरंच काही लाकडाच्या नैसर्गिक आकारानुसार राजेंद्र गुरुजी विविध प्रकारच्या कलाकृती साकारतात. पक्ष्यांच्या आकृती विविध प्राण्यांच्या आकृती मानवी चेहरे व आकृत्या निसर्गाशी संबंधित रचना विविध सजावटीच्या कलाकृती प्रत्येक कलाकृतीमध्ये लाकडाचा नैसर्गिकपणा जपण्याचा प्रयत्न केला जात असल्याने त्या कलाकृतींना वेगळेच सौंदर्य प्राप्त होते.

कलेसोबत पर्यावरण संवर्धनाचा संदेश

आजच्या काळात झाडांची तोड, पर्यावरणाचा ऱ्हास आणि निसर्गापासून वाढते अंतर यामुळे पर्यावरण संवर्धनाची गरज अधिक प्रकर्षाने जाणवत आहे. अशा परिस्थितीत निसर्गात उपलब्ध असलेल्या टाकाऊ वस्तूंचा सर्जनशील वापर करून त्यांना नवे जीवन देण्याचा राजेंद्र गुरुजींचा प्रयत्न निश्चितच वेगळा आहे. त्यांच्या कलाकृतींकडे पाहताना विद्यार्थ्यांना आणि तरुणांना एक महत्त्वाचा संदेश मिळत "निसर्गातील प्रत्येक वस्तू मौल्यवान आहे; तिला जपण्याची आणि पुनर्वापराची दृष्टी विकसित करा."

निसर्गभ्रमंतीपासून कलानिर्मितीपर्यंतचा प्रवास

निसर्गात फिरणे हा केवळ विरंगुळा न राहता त्यातून काहीतरी सर्जनशील निर्माण करता येते, हे राजेंद्र गुरुजींच्या उपक्रमातून दिसून येते. डोंगरमाथ्यावर भटकंती करताना इतरांना दिसणारे लाकूड त्यांना कलाकृतीची शक्यता म्हणून दिसते. त्यामुळे त्यांची निसर्गभ्रमंती ही एका अर्थाने "निसर्गातील कला शोधण्याची मोहीम" बनली आहे. त्यांच्या या छंदातून विद्यार्थ्यांमध्येही निरीक्षणशक्ती, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि पर्यावरणाविषयी प्रेम निर्माण होण्यास मदत होत आहे.

परिसरातून कौतुकाचा वर्षाव

राजेंद्र गुरुजींच्या या अनोख्या कलेची माहिती परिसरातील नागरिक, विद्यार्थी, पर्यटक आणि निसर्गप्रेमींना होत असून त्यांच्या कलाकृतींबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे. साध्या लाकडाच्या तुकड्याकडे वेगळ्या नजरेने पाहण्याची दृष्टी त्यांनी आपल्या या छंदातून दाखवून दिली आहे. टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर, निसर्गाचे संवर्धन आणि कलात्मक सर्जनशीलता यांचा सुंदर संगम त्यांच्या उपक्रमातून पाहायला मिळतो. टाकाऊ लाकूड नव्हे निसर्गाची अनमोल कलाकृती राजेंद्र गुरुजींच्या कलात्मक नजरेतून लाकडांना मिळते नवे जीवन; निसर्गाशी असलेले नाते अधिक घट्ट करण्याचा अनोखा प्रयत्न निसर्ग जपा झाडे वाचवा टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करा निसर्गातील सौंदर्य ओळखा सर्जनशीलतेला वाव द्या निसर्ग आपल्याला कलाकृती देतो फक्त ती पाहणारी नजर हवी

खाकीची मेहेरबानी, गावगुंड बेलगाम! छ. संभाजीनगरात पोलिस व्हॅनमध्ये कुख्यात गुन्हेगाराची रील!

छत्रपती संभाजीनगर : स्थानिक गुन्हेगारी नियंत्रणात ठेवण्यात सपशेल अपयशी ठरलेल्या मुकुंदवाडी पोलिसांचा संतापजनक कारनामा समोर आला. रामनगर, विठ्ठलनगर आणि संघर्षनगरमध्ये दहशत पसरवणाऱ्या प्रफुल्ल उर्फ लादेन या गुन्हेगाराने चक्क पोलिसांच्या गस्तीवरील शासकीय वाहनात बसून रील तयार केली. रात्रीच्या वेळी विठ्ठलनगर चौकात गणेशोत्सवा दरम्यान तयार केलेला हा व्हिडिओ पोलिसांच्या वाहनासह त्याने स्वतःच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून प्रसारितही केला. गंभीर गुन्ह्यांची पार्श्वभूमी असलेल्या एका गुन्हेगाराला थेट पोलिसांच्या शासकीय वाहनात रील बनवण्याची सूट मिळाल्याने पोलिसांची रात्रगस्त कशासाठी सुरू असते, असा संतप्त प्रश्न नागरिक विचारत आहेत.

मुकुंदवाडी पोलिसांच्या हद्दीतील राजनगर, रेल्वेस्थानक, रामनगर, विठ्ठलनगर, जयभवानीनगरात अनेक दिवसांपासून सातत्याने सर्वसामान्यांना मारहाण, वाहनांची तोडफोड, लुटमारीच्या घटना घडत आहेत. नुकतेच रामनगरमध्ये एक एटीएम, दुकान फोडताना दिसलेल्या चोराने स्थानिकाला चाकू दाखवून धमकावले. काही दिवसांपूर्वी पुन्हा याच भागात दुकान फोडण्यात आले. याच टोळीचा म्होरक्या संघर्षनगरचा प्रफुल्ल उर्फ लादेन याच्यावर चोरी, लुटमार, मारहाण आणि दहशत माजवण्यासारखे अनेक गंभीर गुन्हे आहेत. तो साथीदारांसह प्रकाशनगर मैदानावर रोज नशा करून व्यापारी, भाजी विक्रेत्यांना त्रस्त करत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. अवघ्या चार दिवसांपूर्वीच याच लादेनचे गुन्हेगारांसोबत मारहाण झाली होती. त्यानंतर त्यांचे वाद मुकुंदवाडी ठाण्यापर्यंत पोहोचले होते. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने याच ठाण्यातील अधिकारी, अंमलदारांना गुन्हेगारांकडून लाच घेताना तीन वेळा रंगेहात पकडले.

गुन्हेगाराच्या १९ सेकंदांच्या व्हिडिओमध्ये मुकुंदवाडी पोलिसांचे शासकीय वाहन रस्त्यावर उभे असल्याचे स्पष्ट दिसते. त्या मागे गणपती मंडळाचे स्टेज आहे. गुन्हेगार प्रफुल्ल चक्क या पोलिसांच्या वाहनाच्या मागील जाळीदार दरवाजातून बाहेर पडतो. खाली उतरून कॅमेऱ्यासमोर दिमाखात पोज देत आहे. खांद्यावर गुलाबी गमचा, पांढरा शर्ट परिधान केलेला प्रफुल्ल बिनधास्तपणे हाताने गुंडगिरीच्या शैलीत स्टाईल मारत कॅमेऱ्याकडे चालत येतो. बॅकग्राउंडला गुन्हेगारीसारखे गाणे असून पोलिस व्हॅन मध्ये बसलेला हा व्हिडिओ व्हॉट्सॲप स्टेटस, सोशल मीडियावर पोस्ट करून तो धाकपटशाही करताना दिसला.

तडीपार गुन्हेगार कागदावरच

परिसरातील अनेक तडीपार गुन्हेगार रामनगर, विठ्ठलनगरमध्ये खुलेआम वावरताना दिसतात. त्यात जितु नावाचा टवाळखोर चाकू घेऊन फिरतो. लादेन देखील साथीदारांसह प्रकाशनगर मैदानावर रोज नशाबाजी करतो. प्रोझोन मॉलमधील चोरीच्या घटनेतही याच टोळीचा सहभाग होता.

अल्पवयीन साथीदाराला पुढे करून दुकाने साफ

या टोळीमध्ये राजन नावाचा एक अल्पवयीन मुलगा सक्रिय असून, त्याच्या माध्यमातून रामनगरमध्ये एकाच महिन्यात ३ ते ४ दुकाने फोडली. एन-१, म्हाडा कॉलनी आणि प्रोझोन मॉलमधील चोऱ्यांमध्येही याच टोळीचा हात असल्याचा संशय आहे. याच टोळीतील धीरज केदारेला नुकतेच कोल्हापूर येथे 'एमपीडीए' अंतर्गत स्थानबद्धतेची कारवाई झाली. या कारवाईनंतरही त्याच्या समर्थनार्थ याच राजन व लादेनने सोशल मीडियावर पोस्ट केली होती. त्यांचे साथीदार असलेले वैभव उर्फ काळ्या, पठाण आणि जिभेखाली थेट ब्लेड बाळगणारा जितेंद्र नावाचा गुन्हेगार सातत्याने रामनगर, मुकुंदवाडी, विठ्ठलनगर, संजयनगरमध्ये लुटमार, गुंडगिरी करतात. मुकुंदवाडी पोलिसांचे 'भान' मात्र अर्थपूर्ण कारवायांकडेच वळले आहे.

'त्या' पोलिसांची गुन्हेगाराशी मैत्री कशी?

रात्रीच्या वेळी नाकाबंदी व गस्तीच्या नावाखाली बाहेर पडणाऱ्या मुकुंदवाडी पोलिसांच्या वाहनात गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीने प्रवेश कसा केला, पोलिसांची त्याच्यासोबत मैत्री आणि रील बनवू देण्याचा उद्देश काय होता, असा गंभीर प्रश्नही उपस्थित झाला आहे. गणेशोत्सवादरम्यानचा व्हिडिओ स्टेटसला ठेवून धमक्या, गंभीर गुन्हे असणाऱ्या गुन्हेगारांना पोलिसांचेच अभय?

बनावट तिकिटाद्वारे विमानातून प्रवासाचा प्रयत्न, प्रवाशाने तोडले विमानतळाचे सुरक्षा कवच

छत्रपती संभाजीनगर : दोन महिन्यांपूर्वी विमान प्रवास करण्यासाठी उपयोगात आलेल्या तिकिटाचा वापर करून, एकाने शेतकऱ्याला सहा हजार रुपयांमध्ये बनावट विमान प्रवासाचे तिकीट विकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे बनावट तिकिटाच्या आधारे प्रवाशाने विमानतळात प्रवेश केला. विमान कंपनीच्या प्रतिनिधींना तिकिटाबाबत संशय वाटल्याने, बनावट तिकीट विक्रीचे बिंग फुटले.

छत्रपती संभाजीनगर विमानतळावर मुंबईला जाण्यासाठी एक प्रवासी विमानतळात दाखल झाला. त्याच्या तिकिटाची सीआयएसएफने तपासणी करून विमानतळात सोडले. विमान कंपनीच्या कर्मचाऱ्यांना तिकिटाबाबत संशय आल्याने त्यांनी तिकीटाची पाहणी केली असता, कोची ते बेंगलोर प्रवासाचे जूनमधील तिकिटाचा वापर करून छत्रपती संभाजीनगर ते मुंबई तिकीट सहा हजारांत विकल्याचे प्रकरण समोर आले. बनावट तिकीट विक्री करणाऱ्याचे नाव विलास लंबे असे आहे. या प्रकरणी सतीश मधुकर भोळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सतीश भोळे हे इंडिगोमध्ये काम करतात. २ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.०७ वाजताच्या दरम्यान त्यांची सहकारी प्रतिमा थोटे यांनी ज्ञानेश्वर रमेश राऊत (रा. नायगव्हाण) हा सीआयएसएफ यांच्या निगराणीतून तिकीट दाखवून विमानतळात दाखल झाला आहे. त्याच्याकडील विमानाचे तिकीट बनावट असल्याचा संशय आला.

या प्रकरणात विमान कंपनीच्या कर्मचारी प्रतिमा थोटे यांना ज्ञानेश्वर राऊत याच्याजवळ असलेल्या तिकिटाबाबत संशय आला. थोटे यांनी विमान प्रवासाकडील N7K5PQ छत्रपती संभाजीनगर ते मुंबई सकाळी ७.१८ ते ८.१५ वाजताचे फ्लाइट नंबर 6E - 6126 या तिकिटाची छाननी केली असता, हे तिकीट २२ जून रोजी कोची ते बेंगलोर फ्लाइट नंबर 6E - 6126 चे असून या तिकिटावर राहुल रघुनाथन यांनी प्रवास केल्याची माहिती समोर आली. जुन्या तिकिटाचा वापर करून बनावट तिकीट तयार करून सहा हजार रुपयांमध्ये ज्ञानेश्वर रमेश राऊत यांना विलास लंबे याने विकल्याची माहिती समोर आली.

गुन्हा दाखल

जुन्या विमान प्रवाशाच्या तिकीटाचा वापर करून बनावट तिकीट तयार करणाऱ्या विलास लंबे (रा. मयूरपार्क) याच्या विरोधात एमआयडीसी सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक बिघोत हे करीत आहेत.

संभाजीनगरात गुंडांची दहशत! थेट मुख्य न्याय दंडाधिकाऱ्यांची कार अडवली, तिघांना अटक

सलग तीन दिवस तपास केल्यानंतर पोलिसांना आरोपींचा माग काढण्यात यश आलं. अखेर तिघांनाही त्यांच्या घरातून ताब्यात घेण्यात आलं

छत्रपती संभाजीनगर: छत्रपती संभाजीनगरात गुंडांनी हैदोस घातला आहे. पैठणहून न्यायालयीन काम आटोपून छत्रपती संभाजीनगर शहरात परतणाऱ्या मुख्य न्यायदंडाधिकाऱ्याचं शासकीय वाहन अडवत गुंडांनी चालकाला रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण केली. गेल्या मंगळवारी घडलेल्या या धक्कादायक घटनेनंतर पोलिसांनी सलग तीन दिवस तपास केला. अखेर चालकाला मारहाण करणाऱ्या व कारची तोडफोड करणाऱ्या तिन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेनंतर शहरात मोठे खळबळ उडाली होती. आरोपींनी शासकीय वाहन अडवल्यानंतर चालकाला बेदम मारहाण केली होती, तर वाहनाचीही तोडफोड करण्यात आली. या घटनेनंतर पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. सलग तीन दिवस रात्रंदिवस तपास केल्यानंतर पोलिसांना आरोपींचा माग काढण्यात यश आलं. अखेर तिघांनाही त्यांच्या घरातून ताब्यात घेण्यात आलं.

मुख्य न्यायदंडाधिकारी आर. एस. जांबोटकर हे पैठण येथील न्यायालयीन कामकाज आटोपून शासकीय वाहनाने छत्रपती संभाजीनगरकडे परतत होते. त्यावेळी आरोपींनी त्यांचं शासकीय वाहन अडवलं. यानंतर वाहनाच्या चालकाला रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण करण्यात आली. हल्ल्यात चालक जखमी झाला असून त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याचं समोर आलं. यानंतर आरोपींनी वाहनाचीही तोडफोड केली. शासकीय अधिकाऱ्याच्या वाहनावर झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात खळबळ उडाली होती. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तपास सुरू केला.

सलग तीन दिवस पोलिसांचा तपास

घटनेनंतर पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी विविध दिशांनी तपास सुरू केला. सलग तीन दिवस रात्रंदिवस तपास करत पोलिसांनी आरोपींचा माग काढला. अखेर तिघांनाही त्यांच्या राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आलं.

गौरव ऊर्फ बंटी पैठणी, सुरेश गुटाळ आणि विनोद तायडे अशी अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपींची नावं आहेत. गौरव पैठणी हा इंदिरानगर परिसरातील रहिवासी आहे. सुरेश गुटाळ हा बनेवाडी येथील, तर विनोद तायडे हा कर्णपुरा परिसरातील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तिन्ही आरोपी बांधकाम मजुरीचं काम करतात. या तिघांना अटक केल्यानंतर आता हल्ल्यामागचं नेमकं कारण काय होतं, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. दरम्यान, मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांच्या शासकीय वाहनावर झालेल्या या हल्ल्यामुळे न्यायालयीन अधिकाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

गांधी जयंतीनिमित्त ग्रामपातळीवर स्वच्छता मोहीम

• कचरा विलगीकरण, पोषण, आरोग्य व सामाजिक जनजागृतीवर भर •जिल्हाभरात श्रमदान, आरोग्य तपासणी व जनजागृती उपक्रमांना वेग

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी: 'स्वच्छता ही सेवा' आणि 'सेवा संकल्प अभियान' यांच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायती, शाळा, अंगणवाडी केंद्रे व आरोग्य संस्थांमध्ये स्वच्छता, आरोग्य तपासणी, कचरा विलगीकरण, पोषण व सामाजिक जनजागृतीचे विविध उपक्रम उत्स्फूर्तपणे राबविण्यात आले. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त 2 ऑक्टोबर रोजी स्वच्छता अभियानाला विशेष गती देण्यात आली.

पूर्णा तालुक्यातील एरंडेश्वर येथे श्रमदान मोहीम राबविण्यात आली. तसेच कातनेश्वर व नावकी येथे भेट देऊन कचऱ्याचे चार प्रकारांत विलगीकरण करण्याबाबत शाळा व अंगणवाडीमध्ये पोस्टर वितरित करून जनजागृती करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे माहिती, शिक्षण व संवाद तज्ज्ञ ज्ञानेश्वर गायकवाड, बीआरसी सचिन सावळीकर यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी, शिक्षक, अंगणवाडी व आशा सेविका उपस्थित होत्या.

पाथरी तालुक्यातील सिमूरगव्हाण, देवेगाव, बोरगव्हाण आदी ग्रामपंचायतींमध्ये श्रमदान मोहीम राबवून सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. शाळा, अंगणवाडी व ग्रामपंचायत स्तरावर कचऱ्याचे चार प्रकारांत विलगीकरण करण्याबाबत पोस्टरच्या माध्यमातून माहिती देण्यात आली. संबंधित ठिकाणी भेटी देऊन आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गटविकास अधिकारी ऋषिकेश सावंत, उपअभियंता झाल्टे, अभियंता तुषार वाळुंज, पालक अधिकारी आरळकर, बीआरसी सिद्धार्थ सिरसाट यांच्यासह ग्रामविकास अधिकारी, सरपंच/प्रशासक, शिक्षक, अंगणवाडी व आशा सेविका सहभागी झाल्या.

जिंतूर तालुक्यातील मांडवा येथेही श्रमदान मोहीम घेण्यात आली. कचरा विलगीकरणाबाबत शाळा व अंगणवाडीमध्ये पोस्टर वितरित करून जनजागृती करण्यात आली. या उपक्रमात ग्रामपंचायत अधिकारी घोडके, रिलायन्स फाउंडेशनच्या जिल्हा समन्वयक रूपा भांदक्कर, आकाश खुळे, ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, बचतगट महिला व ग्रामस्थ सहभागी झाले.

मानवत तालुक्यातील कुंभारी, तसेच पालम तालुक्यातील बोदरवाडी व खरबधानोरा येथेही गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता उपक्रम राबविण्यात आले. खरबधानोरा येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत पंचायत समितीचे विस्तार अधिकारी एस.पी. टाले यांच्या उपस्थितीत सरपंच निलावती माणिक कुंटे यांच्या हस्ते घंटागाडीचे लोकार्पण करण्यात आले. बचतगटाच्या माध्यमातून स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. अंगणवाडीच्या वतीने राष्ट्रीय पोषण अभियानांतर्गत अभिनव उपक्रमही राबविण्यात आला.

आरोग्य तपासणीला व्यापक प्रतिसाद

सेवा संकल्प अभियानांतर्गत सोनपेठ तालुक्यातील उपकेंद्र डिघोळ येथे रोगनिदान शिबिर घेण्यात आले. शिबिरात 42 नागरिकांची तपासणी करण्यात आली. यामध्ये रक्तदाब, मधुमेह, क्षयरोग, कुष्ठरोग, मोतीबिंदू, कर्करोग आदी आजारांची तपासणी करण्यात आली. संशयित क्षयरुग्णांचे तीन थुंकी नमुने घेण्यात आले. तसेच 11 हिमोग्लोबिन, 4 ईसीजी, 12 रक्तदाब, 16 रक्तशर्करा, 9 मोतीबिंदू, 4 गर्भवती महिला, 6 तोंडाचा कर्करोग, 2 स्तनाचा कर्करोग व 1 गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग तपासणी करण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्र शेळगाव येथेही सेवा संकल्प अभियानांतर्गत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्र एरंडेश्वर येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत 15 महिलांवर बिनटाका स्त्री निर्बीजीकरण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आल्या. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. किशोर सुरवसे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रावजी सोनवणे, जिल्हा निवासी आरोग्य अधिकारी डॉ. सतीश शिंदे व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विद्यासागर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

पोषण, स्वच्छता आणि सामाजिक विषयांवर जनजागृती

कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, पाथरी येथे आयसीडीएस दिवस, पोषण महा व सेवा संकल्प अभियानानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. विद्यालयातील सुमारे 250 मुलींना किशोरवयीन मुलींचा आहार, बालविवाह व स्वच्छता या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. देवनंद्रा क्रमांक 4 अंगणवाडी केंद्रात 'आशीर्वादाचा दिवा' हा उपक्रम घेण्यात आला.

गांधी जयंतीच्या निमित्ताने विविध ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छता, श्रमदान, कचरा विलगीकरण, आरोग्य तपासणी, पोषण व जनजागृतीचे उपक्रम राबविण्यात आल्याने 'सेवा संकल्प अभियान'च्या माध्यमातून ग्रामपातळीवरील लोकसहभागाला चालना मिळत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

पदवीधर मतदारसंघासाठी चौथ्या दिवशी 10 उमेदवारांचे अर्ज

31 इच्छुकांनी घेतली 59 नामनिर्देशन पत्रे

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन प्रक्रियेला वेग आला असून, चौथ्या दिवशी ३१ इच्छुकांनी ५९ नामनिर्देशन पत्रे घेतली. तर दुपारी ३ वाजेपर्यंत तब्बल १० उमेदवारांनी आपले नामनिर्देशन अर्ज दाखल केले. शुक्रवारी अर्ज दाखल करणाऱ्यांमध्ये श्रीधर नारायण साळवे (भीमसेना), संजीवनी मदन टेकाळे (अपक्ष), नामदेव केरबा वाघमोडे (अपक्ष), अकील अहमद शेख (आम आदमी पार्टी), ॲड. अंबादास जाधव (अपक्ष), अविनाश बंडू गोरे (अपक्ष), पाटील कसारे रमेश विनायकराव (अपक्ष), शेख अब्दुल मलिक अब्दुल खुद्दुस (राष्ट्रीय समाज पक्ष), संजीवनी मदनराव टेकाळे (स्वराज्य निर्माण सेना) आणि कृष्णा त्रिंबकराव पवार (अपक्ष) यांचा समावेश आहे.

दरम्यान, आजअखेर ९७ इच्छुकांना एकूण १७४ नामनिर्देशन पत्रांचे वितरण झाले आहे. आतापर्यंत १२ उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून, आगामी दिवसांत अर्ज दाखल करणाऱ्यांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचा ध्वजारोहण केल्याबद्दल माजी सैनिकाला मारहाण

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

परभणी:- मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून माजी सैनिक तसेच पोलीस दलातून हवालदार पदावरून सेवानिवृत्त झालेल्या ज्येष्ठ नागरिकाला तू 17 सप्टेंबरला गावातील झेंडा कसा काय चढवलास असे म्हणत माजी सैनिकाला मारहाण केली. सदरील घटना 30 सप्टेंबर पावणे एकच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील कॅन्टीन जवळ घडली. आरोपीवर ॲट्रॉसिटी व इतर कलमाखाली नवा मोंढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील तक्रार रोहिदास माणिकराव खंदारे वय 63 वर्ष यांनी दिली आहे माजी सैनिक असून महाराष्ट्रपोलीस दलातून हवालदार या पदावरून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांनी 17 सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त बलसा बुद्रुक ग्रामपंचायत कार्यालयात माजी सैनिक असल्यामुळे त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले होते व 19 सप्टेंबरला सकाळी बलसा बुद्रुक येथील ग्रामसेवक यांनी गावातील सुरेश ज्ञानोबा डुबे याने गावात दुसरे कोणी नव्हते का तुम्ही रोहिदास यांचेच नाव का घेतले असे म्हणत अर्वाच भाषेत बोलल्याचे सांगितले 30 सप्टेंबरला दुपारच्या सुमारास सुरेश दुबे फिर्यादीला फोन करून जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात बोलवले याच ठिकाणी संबंधिताने रागाच्या भरात जातीवाचक शिवीगाळ केली तू गावातील झेंडा कस काय चढविला असे म्हणत मारहाण केली सुधीर याप्रकरणी सुरेश ज्ञानोबा डुबे याच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला.

एमजीएममध्ये 'पैशाचं झाड' एकांकिकेतून सामाजिक वास्तवाचे दर्शन



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजी नगर : महात्मा गांधी यांच्या १५७व्या जयंतीनिमित्त महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने राजकुमार तांगडे लिखित 'पैशाचं झाड' या एकांकिकेचे सादरीकरण करण्यात आले. विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात झालेल्या या सादरीकरणात विद्यार्थ्यांनी विविध व्यक्तिरेखा साकारत आपल्या अभिनयाची छाप पाडली.

'पैशाचं झाड' या एकांकिकेतून सामाजिक वास्तव, मानवी मूल्ये आणि पैशाभोवती केंद्रित होत जाणाऱ्या जीवनशैलीवर भाष्य करण्यात आले. बदलत्या सामाजिक परिस्थितीत माणसाच्या आयुष्यात पैसा आणि भौतिक सुखांना मिळत जाणारे महत्त्व, तसेच त्याचा मानवी नातेसंबंधांवर होणारा परिणाम यांचे प्रभावी चित्रण विद्यार्थ्यांनी अभिनयातून केले. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या विविध व्यक्तिरेखांना उपस्थितांकडून दाद मिळाली. एकांकिकेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांकडे कलात्मक पद्धतीने लक्ष वेधण्यात आले. यावेळी एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई, विभागप्रमुख डॉ. राजू सोनवणे यांच्यासह सर्व संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी आणि विद्यापीठातील मान्यवर उपस्थित होते.

अटल वयो अभ्युदय योजनेच्या समितीवर प्रा. संतोष बोर्डे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या अटल वयो अभ्युदय योजना (AVYAY) अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या वृद्धाश्रम व निरंतर काळजी गृह प्रकल्पांच्या निवड समितीवर शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रा. संतोष बोर्डे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षित, सक्षम आणि सन्मानपूर्ण जीवनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच वृद्धाश्रम व निरंतर काळजी गृह प्रकल्पांची योग्य निवड आणि त्यांच्या कार्यपद्धतीवर देखरेख ठेवण्याच्या दृष्टीने ही समिती कार्य करते. सामाजिक न्याय विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ही राज्यस्तरीय समिती कार्यरत आहे. या समितीत समाजकल्याण आयुक्त, पुणे, अर्थसंकल्प विभागाचे सचिव व उपसचिव, ज्येष्ठ नागरिक कक्षाचे अधिकारी तसेच संबंधित विभागांचे प्रतिनिधी सदस्य म्हणून कार्यरत आहेत. प्रा. संतोष बोर्डे यांच्या नियुक्तीबद्दल महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट, युवासेना कार्यकारिणी सदस्य व नगरसेविका हर्षदा शिरसाट यांनी अभिनंदन केले. तसेच शिवसेनेचे नेते, पदाधिकारी, सामाजिक संस्था आणि कार्यकर्त्यांकडूनही त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कौशल्याबाई गव्हांडे यांचे निधन

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



सोयगाव,दि.३ ऑक्टोबर : येथील कौशल्याबाई मधुकर गव्हांडे(वय.६५)यांचे दि.२ शुक्रवार मध्य रात्री ११ .५० वाजता निधन झाले.त्यांच्यावर दि.३ शनिवार रोजी ११ .०० वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात एक मुलगा,एक मुलगी,नातवंडे असा परिवार होत.होमगार्ड भास्कर गव्हांडे यांच्या त्या काकू होत.

मनपा शाळांमध्ये 'स्वच्छ शाळा अभियान' उत्साहात सुरु; उत्कृष्ट शाळांना मिळणार 'स्वच्छ व सुंदर शाळा पुरस्कार'

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर

महानगरपालिकेच्या वतीने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोक कल्याण अभियान अंतर्गत महापालिका क्षेत्रातील शाळांमध्ये विशेष 'स्वच्छ शाळा अभियान' राबविण्यात येत आहे. महानगरपालिकेचे आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर या विजयादशमीपर्यंतच्या कालावधीत ही मोहीम हाती घेण्यात आली असून, यादरम्यान महापालिकेच्या सर्वच शाळांमध्ये व्यापक स्वरूपात स्वच्छता मोहीम राबवली जात आहे. या अभियानांतर्गत शाळांमधील वर्गखोल्या, शालेय इमारतींचे व्हरांडे, संपूर्ण परिसर, क्रीडांगणे, स्वच्छतागृहे तसेच वॉल कंपाऊंडजवळील परिसराची कसून स्वच्छता केली जात आहे.

या महत्त्वपूर्ण मोहिमेचा अधिकृत शुभारंभ मनपाच्या के. प्रा. शाळा, नारेगाव येथे महानगरपालिकेचे उपायुक्त अंकुश पांढरे यांच्या हस्ते करण्यात आला. या शुभारंभ प्रसंगी कार्यक्रमाधिकारी ज्ञानदेव सांगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका तिलोत्तमा मापारी यांच्यासह सर्व शिक्षकवृंद आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या मोहिमेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होण्यासोबतच परिसराच्या स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले जात आहे. प्रशासनाच्या या उपक्रमाला शाळेतील सर्व स्तरांमधून उत्तम प्रतिसाद मिळत असून शिक्षक, विद्यार्थी, शिपाई आणि इतर सर्व कर्मचारी वर्ग 'आपला वर्ग, आपली शाळा, आपली इमारत आणि आपला परिसर' सुंदर ठेवण्यासाठी स्वतःहून पुढे येत श्रमदान करत आहेत.

या अभियानाची सांगता झाल्यानंतर महापालिकेच्या सर्व शाळांचे विशेष मूल्यांकन केले जाणार आहे. यामध्ये ज्या शाळा स्वच्छता आणि सौंदर्य टिकवून ठेवण्याच्या निकषांवर अव्वल ठरतील, अशा सर्वात स्वच्छ शाळांना आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार 'स्वच्छ व सुंदर शाळा पुरस्कार' देऊन गौरविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे मनपा शाळांमधील स्वच्छता मोहिमेला एक वेगळेच जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या मोहिमेचा पुढील टप्पा म्हणून आगामी ५ ऑक्टोबर रोजी मनपा के. प्रा. शाळा, इंदिरानगर बायजीपुरा आणि मनपा प्रा. शाळा, अशोकनगर येथे विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

वाघी बो. येथे ग्रामसभा व स्वच्छता मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



परभणी,: 'सेवा संकल्प अभियान'अंतर्गत जिंतूर तालुक्यातील ग्रामपंचायत वाघी बो. येथे ग्रामसभा तसेच स्वच्छता मोहीम उत्साहात राबविण्यात आली. ग्रामस्थ, ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी व विविध विभागांच्या प्रतिनिधींनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

यावेळी ग्रामसभेत गावाच्या सर्वांगीण विकासासोबतच स्वच्छता, आरोग्य, कचरा व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि नागरिकांचा सहभाग या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. गाव स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन करण्यात आले.

यानंतर ग्रामपंचायत परिसर, सार्वजनिक ठिकाणे, रस्ते व परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी कचरा संकलन करून परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच नागरिकांना ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करण्याचे आवाहन करण्यात आले.

'सेवा संकल्प अभियान'च्या माध्यमातून स्वच्छ गाव, निरोगी गाव आणि सुंदर गाव घडविण्यासाठी ग्रामस्थांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याचा संकल्प केला. ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे वाघी बो. येथील उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

वडगाव जि. प. शाळेत विद्यार्थ्यांनी अनुभवला ध्यान-योगाचा आनंद

सेवा संकल्प अभियानांतर्गत आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी





परभणी:--- सेवा संकल्प अभियानांतर्गत आज प्राथमिक आरोग्य केंद्र, वडगाव (ता. सोनपेठ) यांच्या वतीने जि. प. प्राथमिक शाळा, वडगाव येथे ध्यान व योग शिबिर उत्साहात पार पडले.

यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध योगासने, प्राणायाम व ध्यानाचा सराव केला. नियमित योग आणि ध्यानामुळे शरीर निरोगी राहण्यासोबतच मनाची एकाग्रता, मानसिक शांतता आणि सकारात्मक विचारसरणी वाढण्यास मदत होते, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच आरोग्यदायी सवयी रुजविणे आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

वनामकृवित महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांचे स्मरण, अभिवादन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



परभणी :-राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या सिम्पोजियम सभागृहात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि होते. त्यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार, शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे तसेच कुलसचिव श्री. पुरभा काळे अधिष्ठाता डॉ. प्रविण वैद्य, कृषि रसायन आणि मृदा शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ हरिहर कौसडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात उपकुलसचिव (सामान्य प्रशासन) श्री. पद्माकर पाटील यांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्याची व देशासाठी दिलेल्या योगदानाची माहिती उपस्थितांना दिली. सत्य, अहिंसा, स्वच्छता, साधेपणा, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रसेवेचे मूल्य समाजजीवनात रुजविण्यासाठी या महापुरुषांच्या विचारांचे स्मरण महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

यावेळी विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील विविध कार्यालयांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या विचारांना आदरांजली वाहिली. कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

परभणी जिल्ह्यात पीक परिस्थितीचा प्रशासनाकडून आढावा; पंचनाम्याची कार्यवाही युद्धपातळीवर

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी : जिल्ह्यातील विविध भागांमध्ये निर्माण झालेल्या प्रतिकूल हवामान व पावसाच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीची वस्तुनिष्ठ माहिती संकलित करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पंचनाम्याची कार्यवाही वेगाने सुरू केली आहे. शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत व शासनाच्या नियमानुसार लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासन अलर्ट मोडवर कार्यरत आहे.

जिल्ह्यातील संबंधित महसूल, कृषी व ग्रामस्तरीय यंत्रणांना पीक परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित अधिकारी व कर्मचारी शेतशिवारात प्रत्यक्ष भेट देऊन पिकांची स्थिती, नुकसानीचे स्वरूप व बाधित क्षेत्राची माहिती संकलित करीत आहेत.

पंचनाम्याची प्रक्रिया पारदर्शक, वस्तुनिष्ठ आणि वेळेत पूर्ण करण्यावर प्रशासनाचा भर असून, प्राप्त माहितीच्या आधारे शासनाच्या प्रचलित निकषांनुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

पंचनामे चालू असलेल्या कामकाजाची उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, तहसीलदार संदीप राजपुरे यांनी प्रत्यक्ष शेत शिवारात जाऊन पाणी करून सूचना केल्या.

शेतकऱ्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन

पंचनाम्याच्या वेळी शेतकऱ्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी. आपल्या शेतातील पिकांची सद्यस्थिती व झालेल्या नुकसानीची माहिती प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्यावी. पंचनाम्याच्या प्रक्रियेसाठी शेतकऱ्यांनी संबंधित तलाठी, ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहाय्यक अथवा संबंधित महसूल यंत्रणेशी संपर्क साधावा. जिल्ह्यातील परिस्थितीवर प्रशासनाकडून सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून, शेतकऱ्यांना आवश्यक त्या शासकीय मदतीसाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

नशामुक्त युवा संकल्पासाठी आज आरोग्य पदयात्रा

आज बीबी का मकबऱ्यापासून विद्यापीठापर्यंत आरोग्य पदयात्रा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - 'विकसित भारतासाठी नशामुक्त युवा' अभियानांतर्गत ४ ऑक्टोबर रोजी शहरात आरोग्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८ वाजता बीबी का मकबरा येथून पदयात्रेला सुरुवात होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेशद्वारापर्यंत ती जाणार आहे. जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. या पदयात्रेत सहभागी होणार आहेत.

मेरा युवा भारत छत्रपती संभाजीनगरच्या वतीने आयोजित या उपक्रमातून युवकांना अमली पदार्थ व विविध व्यसनांच्या दुष्परिणामांबाबत जागरूक करण्यात येणार आहे. निरोगी जीवनशैली, शारीरिक तंदुरुस्ती आणि मानसिक स्वास्थ्याचा संदेश देत युवकांनी व्यसनांपासून दूर राहावे, यासाठी जनजागृती केली जाणार आहे.

पदयात्रेत शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी, मेरा युवा भारतचे स्वयंसेवक, एनएसएस, एनसीसी, युवा संघटना तसेच विविध घटक सहभागी होणार आहेत. 'पुढे पाऊल टाका, व्यसनमुक्त रहा' हा संदेश देत युवकांनी स्वतः व्यसनमुक्त राहण्यासोबतच कुटुंबीय व मित्रांनाही त्यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

'१०० आठवडे नशामुक्त युवा अभियान' अंतर्गत हा उपक्रम राबविला जात आहे.

सोयगाव शहरातील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात वाणिज्य मंडळाचे उद्घाटन



हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

सोयगाव,दि.३ ऑक्टोबर - अजिंठा शिक्षण संस्था संचालित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे वाणिज्य विभागाच्या अंतर्गत वाणिज्य मंडळाची स्थापना करण्यात आली. या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून डॉ.उल्हास पाटील उपस्थित होते तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार व प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.आर.के.बारोटे,डॉ. सुभाष पाटील उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी डॉ. उल्हास पाटील यांनी विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेतील विविध संधीबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेतील महत्त्वाच्या २६ क्षेत्राबद्दल व त्यातील संधीबद्दल सखोल असे मार्गदर्शन केले. त्यामध्ये प्रामुख्याने बँकिंग व अकाउंटिंग या क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त संधी असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.निलेश गावडे यांनी केले व प्रा. अर्जुन शेजुल यांनी आभार प्रदर्शन केले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस साजरा; महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान; डॉ.श्रीकृष्ण परिहार यांचे मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



सोयगाव,दि.३ ऑक्टोबर

अजिंठा शिक्षण संस्था संचलित, संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.दि.३ शनिवार रोजी महाविद्यालयाच्या व्यवस्थापन कक्षात हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार होते. प्रमुख वक्ते म्हणून राज्यशास्त्र विभागाचे डॉ.श्रीकृष्ण परिहार उपस्थित होते. प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे तसेच कै. बाबुरावजी काळे महाविद्यालय अजिंठा येथील प्राचार्य डॉ. संभाजी वाघमारे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक पारधे यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करताना महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांचे आजच्या युवा पिढीच्या जीवनातील महत्त्व अधोरेखित केले.

यानंतर डॉ. श्रीकृष्ण परिहार यांनी विशेष व्याख्यानातून महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा, शांतता, स्वच्छता, सामाजिक समता आणि मानवतेच्या विचारांचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रसेवेच्या कार्याची माहिती देत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांतून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. अहिंसा ही केवळ हिंसा न करण्याची संकल्पना नसून आपल्या विचारांत, शब्दांत आणि कृतीत शांतता व मानवतेचा स्वीकार करणे होय, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांचे आजच्या युवा पिढीसाठी असलेले महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी सत्य, अहिंसा, शिस्त, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रसेवेची मूल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील चौधरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. मनोजकुमार चोपडे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील चौधरे, डॉ. दीपक पारधे आणि डॉ. मनोजकुमार चोपडे यांनी परिश्रम घेतले.

सत्य, अहिंसा, शांतता आणि राष्ट्रसेवेचा संदेश देणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

घाटीत जागतिक पीपीएच दिनानिमित्त विशेष कार्यशाळा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : प्रसूतीपश्चात अतिरक्तस्रावामुळे (पीपीएच) होणारे मातामृत्यू रोखण्यासाठी वेळेत निदान, प्रतिबंध आणि प्रभावी उपचारपद्धतींबाबत जनजागृती व वैद्यकीय कौशल्यविकास करण्याच्या उद्देशाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे जागतिक पीपीएच दिनानिमित्त विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी (५ ऑक्टोबर) दुपारी २ ते ५ या वेळेत बजाज संकुल येथे ही कार्यशाळा होणार आहे.

कार्यशाळेस प्रसूती व स्त्रीरोग विभागप्रमुख डॉ. श्रीनिवास गडप्पा, प्राध्यापक डॉ. सोनाली देशपांडे, आरोग्य सेवेच्या उपसंचालक डॉ. कांचन वानेरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कमलाकर मुधखेडकर, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धनोरकर आणि आरोग्य सेवेचे सहायक उपसंचालक डॉ. दयानंद मोतीपावळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते होणार आहे. जागतिक आरोग्य संघटनेने ५ ऑक्टोबर हा जागतिक पीपीएच दिन म्हणून निश्चित केला असून, ५ ऑक्टोबर २०२६ रोजी पहिला जागतिक पीपीएच दिन साजरा केला जाणार आहे.

प्रसूतीदरम्यान होणाऱ्या अतिरक्तस्रावामुळे जगभरात मोठ्या प्रमाणावर मातामृत्यू होतात. दर १२ मिनिटांनी एका महिलेचा मातामृत्यू होत असून, दरवर्षी सुमारे ४५ हजार मातांचा मृत्यू पीपीएचमुळे होतो, अशी माहिती देण्यात आली. हे मृत्यू रोखण्यासाठी वेळेत निदान, प्रतिबंध, योग्य उपचार आणि प्रभावी व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे. याच अनुषंगाने आरोग्य क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना आवश्यक ज्ञान व कौशल्य देणे हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश आहे.

परिचारिका, आरोग्य अधिकारी तसेच प्रसूती व स्त्रीरोगतज्ज्ञांसाठी आयोजित या कार्यशाळेत पीपीएचचे वेळेत निदान, प्रतिबंध, उपचार आणि व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रत्यक्ष परिस्थितीत प्रभावीपणे उपचार करण्यासाठी आवश्यक कौशल्यांवरही विशेष भर दिला जाणार आहे.

शेतकरी समृद्धी, ग्राहकांचा विश्वास; 'देवगिरी महानंद'चा बाजारविस्तार

दूध उत्पादकांना मिळणारा परतावा 72.47 टक्क्यांवरुन 78.50 टक्क्यांवर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाने (एनडीडीबी) एप्रिल २०२४ पासून छत्रपती संभाजीनगर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर संघाच्या आर्थिक आणि व्यावसायिक कामकाजाला गती मिळाली आहे. संघाने सलग दोन वर्षे नफा नोंदविला असून, दूध खरेदीचा सरासरी दर २९.१६ रुपयांवरून ३७.५८ रुपये प्रतिलिटर झाला आहे. त्याचबरोबर दूध उत्पादकांना मिळणारा परतावा ७२.४७ टक्क्यांवरून ७८.५० टक्क्यांपर्यंत वाढला आहे. त्यामुळे 'देवगिरी महानंद'च्या प्रगतीचा थेट फायदा दूध उत्पादक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत असल्याचे चित्र आहे.

एनडीडीबीच्या व्यवस्थापनानंतर संघाच्या आर्थिक स्थितीतही सुधारणा झाली आहे. संघाच्या मुदत ठेवी ६.८१ कोटी रुपयांवरून ११.७६ कोटी रुपयांपर्यंत वाढल्या आहेत. सन २०२५-२६ मध्ये दूध उत्पादकांना तब्बल ७७.४० कोटी रुपये अदा करण्यात आले. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा ८.२५ कोटी रुपये अधिक रक्कम दूध उत्पादकांच्या हाती पोहोचली आहे. तसेच दोन वर्षांच्या कालावधीत १.९१ कोटी रुपयांपेक्षा अधिक भावफरक प्रोत्साहन आणि १५.६० लाख रुपयांचा लाभांश वितरित करण्यात आला आहे.

दुसरीकडे 'देवगिरी महानंद'ने बाजारपेठ विस्तारावरही भर दिला आहे. चालू आर्थिक वर्षात पॅकबंद दूध विक्रीत सुमारे ८ टक्के वाढ झाली असून, मूल्यवर्धित दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीत जवळपास ६० टक्क्यांनी वाढ नोंदविण्यात आली आहे. दही, लस्सी, ताक आणि तुपाच्या विक्रीतही लक्षणीय वाढ झाली आहे.

१६ झोनमधून वितरण; ऑनलाइन घरपोच सेवेलाही प्रतिसाद

ग्राहकांपर्यंत उत्पादने सहज पोहोचावीत यासाठी १६ झोनची वितरण व्यवस्था उभारण्यात आली आहे. दूध पार्लर तसेच ऑनलाइन घरपोच विक्रीच्या माध्यमातून 'देवगिरी महानंद'ची उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहेत. त्यामुळे पारंपरिक विक्रीव्यवस्थेबरोबरच आधुनिक वितरण प्रणालीलाही चालना मिळाली आहे.

संघाच्या आधुनिकीकरणासाठी ४५० किलोवॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पाचे कामकाज सुरू करण्यात आले आहे. फ्लेवर्ड मिल्क उत्पादन आणि पॅकिंगसाठी पी.पी. बॉटल प्रकल्पासही मंजुरी देण्यात आली आहे. रेल्वे स्थानकांच्या प्लॅटफॉर्मवर दूध आणि दुग्धजन्य पदार्थांची विक्री करण्यासाठी सहा स्टॉल्स उपलब्ध झाले आहेत. यामुळे उत्पादनांची विक्री वाढविण्यासोबतच नव्या बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

दूध उत्पादकांना अधिक परतावा, ग्राहकांना दर्जेदार दुग्धजन्य उत्पादने आणि उत्पादनांसाठी व्यापक बाजारपेठ, या त्रिसूत्रीवर 'देवगिरी महानंद'ची वाटचाल सुरू आहे. संघाची प्रगती म्हणजे दूध उत्पादक शेतकऱ्यांची समृद्धी, हे सहकाराचे ध्येय प्रत्यक्षात आणण्यावर संघाचा भर असल्याचे व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती संभाजीनगर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या., छत्रपती संभाजीनगर यांनी स्पष्ट केले आहे.

जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीची पाहणी; जिल्हाधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांशी थेट संवाद

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर - जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज जिल्ह्यातील विविध भागांचा दौरा केला. माळीवाडा (ता. छत्रपती संभाजीनगर), सराई (ता. खुलताबाद), वारेगाव (ता. फुलंब्री) आणि चौका (ता. छत्रपती संभाजीनगर) या परिसरांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांनी शेताच्या बांधावर जाऊन पिकांच्या सद्यस्थितीचे अवलोकन केले आणि शेतकऱ्यांसोबत संवाद साधला.

या पाहणी दौऱ्यादरम्यान जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, उपविभागीय कृषी अधिकारी आनंद गंजेवार, तहसीलदार शिवानंद बिडवे यांच्यासह छत्रपती संभाजीनगर, खुलताबाद व फुलंब्रीचे तालुका कृषी अधिकारी आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांशी संवाद साधताना जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी शेतकऱ्यांना धीर देत सांगितले की, संकटकाळात शेतकऱ्यांनी सकारात्मक राहावे आणि अचूक पंचनामे करण्यासाठी शासकीय यंत्रणेला पूर्ण सहकार्य करावे. शासन आणि प्रशासन शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत देण्यासाठी कटिबद्ध असून, कुठलाही पात्र शेतकरी शासकीय लाभापासून वंचित राहणार नाही याची खात्री खुद्द जिल्हाधिकारी देणार आहेत. तसेच पिण्याच्या पाण्याचा अनधिकृत उपसा तातडीने बंद करून पिण्याचे पाणी संरक्षित करण्यासाठी संबंधित यंत्रणेला सक्त निर्देश देण्यात आले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दुष्काळाच्या या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, जनावरांसाठी चारा आणि पाण्याची उपलब्धता, टँकरद्वारे पाणीपुरवठा, चारा छावण्यांची गरज तसेच ग्रामीण भागातील रोजगाराच्या संधी याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. पिकांचे झालेले नुकसान, पाण्याची तीव्र टंचाई आणि शेतकऱ्यांच्या वैयक्तिक अडचणींचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शासनाच्या निकषांनुसार सर्वतोपरी मदत व सवलती उपलब्ध करून देण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

पिकांची सद्यस्थिती, संभाव्य उत्पादन घट आणि शेतकऱ्यांच्या तातडीच्या गरजांचे योग्य मूल्यांकन करून सर्व विभागांनी परस्परांच्या समन्वयाने काम करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. तसेच कठीण काळात पाणी बचत, उपलब्ध जलस्रोतांचा काटेकोर वापर आणि पर्यायी पिकांच्या लागवडीबाबत शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी याप्रसंगी संबंधित विभागांना दिले.


धसाडी गावात हळदीच्या शेतात गांजाची लागवड

153 किलो गांजा जप्त. दैठणा पोलिसांची कारवाई

हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी



परभणी:- एकीकडे पाणी पाऊस नसल्यामुळे यावेळी ची सर्व पिके करपून गेली असताना . चक्क हळदीच्या शेतात केलेल्या गांजाच्या लागवडीवर दैठणा पोलीस पोलिसांच्या पथकाने सीताफिने धाड टाकत कारवाई केली या कारवाई जवळपास 76 लाख रुपये किमतीचा 153 किलो गांजा जप्त करण्यात आला असून सोबतच एकाला ताब्यात घेण्यात आले आहे सायंकाळी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्यात आला. टेक्नो पोलीस ठाणे हद्दीतील एका शेतकऱ्यांच्या शेतात बेकायदेशीररित्या गांजाचे झाडे लागवड केल्याचे आढळून आले त्याची माहिती देठणा पोलिसांना मिळताच शुक्रवारी सकाळी नऊच्या सुमारास गांजा असलेल्या ठिकाणी छापा टाकला व छापा मध्ये सायंकाळी पाच वाजेपर्यंत कारवाई सुरूच होती यामध्ये गांजाची सर्व झाडे ताब्यात घेतली असून जवळपास 153 किलो वजनाचा गांजा जप्त केला आहे अंदाजी किंमत 76 लाख रुपये किमतीचा गांजा जप्त करण्यात आला सदरील घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी एन एल रिठे सपोनि पोलीस उपनिरीक्षक निखिल पवार पोलीस आमदार विठ्ठल कुंडगीर ज्ञानेश्वर चोपडे विनोद मुळे अमोल दुबे संजय सानप लक्ष्मीकांत कस्यप अशोक रसाळ फॉरेन्सिकचे पथक महसूल कर्मचारी पथक उपस्थित होते पुढील कार्यवाही चालू आहे.





मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911